# अतिथी संपादकीय

## नेमेची येणारा हा अर्थसंकल्प नव्हे

दरवर्षी आपल्या देशाचे एक एप्रिलपासून नवीन वित्तवर्ष सुरू होते. त्याआधी दोन महिने केंद्रातील सरकार लोकसभेपुढे मागच्या आर्थिक वर्षाचा आढावा व पुढील वर्षासाठी प्रस्ताव असलेला अर्थसंकल्प सादर करते. देशातील कंपन्या, देशातील व परकीय गुंतवणूकदार, बँकिंग क्षेत्र व स्टॉक मार्केट, अर्थव्यवस्थेची अनेकानेक उपक्षेत्रे आणि कोट्यावधी कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थापनावर लक्षवेधी परिणाम करणारे प्रस्ताव आणि योजना अर्थसंकल्पात मांडल्या जाण्याचा प्रघात आहे. सहाजिकच अर्थसंकल्पाच्या दिवसाची आणि अर्थसंकल्पात नक्की काय असेल याची अनेकांना उत्सुकता असते. नागरिकांच्या मनात केंद्रीय अर्थसंकल्पाची अशी प्रतिमा तयार होण्याची कारणेदेखील आहेत. यापूर्वीच्या अनेक अर्थसंकल्पातील प्रस्ताव व योजनांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर दूरगामी आणि खोल परिणाम केलेले आहेत.

अजूनही न संपलेली कोरोना महासाथ फक्त आरोग्य क्षेत्रावरील अरिष्ट नव्हते. या महासाथीने देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर विशेषतः बॉटम ऑफ पिरॅमिडमधील कोट्यावधी कुटुंबांसमोर उभे केलेली उभी केलेली आर्थिक आव्हानेदेखील तेवढीच गंभीर आहेत. साहजिकच या वर्षीच्या अर्थसंकल्पात मायबाप सरकार कोट्यवधी नागरिकांसाठी काही उपाययोजना जाहीर करेल अशी वाजवी अपेक्षा होती. पण

दोन-चार ठळक गोष्टी सोडल्या तर सादर झालेल्या अर्थसंकल्पात काहीच दम नाही अशी भावना तयार झाली आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पाची देशाच्या अर्थव्यवस्थेत निर्णायक हस्तक्षेप करण्याची ताकद सत्ताधारी राजकीय नेते, नोकरशहा व अर्थ-सल्लागारांना ठाऊक नाही असे होऊच शकत नाही. तरीदेखील एवढ्या मोठ्या आर्थिक अरिष्टावर मात करण्यासाठी अर्थसंकल्प न वापरण्याचा निर्णय सजग निर्णयच असू शकतो. याचे राजकीय अन्वयार्थ लावण्याची गरज आहे. अर्थसंकल्पातील असलेल्याच नव्हे तर अपेक्षा असूनदेखील नसलेल्या तरतुदी काय आहेत आणि त्यातून राज्यकर्त्यांना काय राजकीय संदेश द्यायचा आहे याचे अंदाज बांधता येतील.

(अ) गेली अनेक महिने देशातील गरिबी वाढली आहे; क्रयशक्ती घटली आहे. केंद्र सरकारने डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर किंवा कंझम्पशन कुपन्स द्वारे गरीब नागरिकांच्या हातात नगद ठेवावी असे अनेक अर्थतज्ज्ञ सुचवत होते. पण आम्ही अशी कृत्रिमपणे क्रयशक्ती वाढवणार नाही, सामान्य नागरिकांना उत्पादक कामात सहभागी होऊनच स्वतःची क्रयशक्ती कमवावी लागेल असे सांगण्यात आले. त्यासाठी भांडवली गुंतवणुकीसाठी साडेसात लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

(ब) देशात केंद्र सरकारला नमवणारे मोठे शेतकरी आंदोलन झाले. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी बरेच काही असेल अशी अपेक्षा होती. पण आंदोलन करून आमच्यावर दडपण आणून कोणताही समाजघटक त्याला हवे ते आमच्याकडून पदरात पाडून घेऊ शकणार नाही असा मेसेज दिला गेला आहे.

(क) केंद्रीय सत्ता राखण्यासाठी निर्णायक असणाऱ्या उत्तरप्रदेशसारख्या राज्यातील निवडणुका कोपऱ्यावर आलेल्या आहेत. निवडणुकांच्या आधी अर्थसंकल्प असेल तर अर्थसंकल्पात मतदारांना

चुचकारणाऱ्या योजना जाहीर करण्याची अनेक दशकांची रीत आहे. पण आम्ही मते मिळावीत म्हणून लोकानुनयी अर्थसंकल्प सादर करणार नाही असे कृतीतून दाखवून देण्यात आले.

(ड) सरकारी आणि ऑक्सफॅम यांसारख्या संस्था देशात वाढलेल्या आर्थिक विषमतेकडे बोट दाखवत होत्या. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी देशातील श्रीमंतावर/उच्च मध्यमवर्गीयांवर कर लावले जातील असे बोलले जात होते. पण श्रीमंत होण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. श्रीमंत झाल्यावर कर लादून त्याला आम्ही शिक्षा करू इच्छित नाही असे तत्त्वज्ञान सुनावण्यात आले.

(इ) कोरोनासाठीच्या मदत पॅकेजसाठी व अर्थव्यवस्थेला पुनर्चालना देण्यासाठी सरकारचा खर्च खूप वाढलेला आहे. नवीन वित्तीय स्रोत उभे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर, विशेषतः व्यक्ती आणि कंपन्यांवर आयकर, वाढवले जातील अशी भीती व्यक्त केली जात होती. सरकारला वाढीव वित्तीय स्रोत हवे आहेत. पण त्यासाठी करसंकलनावर नाही तर नवीन कर्ज उभारणीवर भर देऊन सरकारने पुढच्या वर्षभरात १५ लाख कोटींचे कर्ज काढायचे ठरवले आहे; जो आकडा एक ऐतिहासिक उच्चांक आहे.

सर्वात नोंद घेण्याजोगे आहे ते ग्रामीण/ शहरी गरिबांसाठी जीवनदायी असणाऱ्या अनेक लोकल्याणकारी योजनांच्या तरतुदीमधील लक्षणीय घट किंवा न केलेली वाढ. पुढे २०२१-२२ वर्षीचे सुधारित खर्च आणि २०२२-२३ सालासाठी अर्थसंकल्पातील तरतुदी दिल्या आहेत (आकडे कोटी रुपयांमध्ये) : ग्रामीण विकास (२,०७,००० विरुद्ध २,०६,०००); शेती क्षेत्र (१,४८,००० विरुद्ध १,५०,०००) ; ग्रामीण रोजगार हमी योजना (९८,००० विरुद्ध ७३,०००); आरोग्य क्षेत्र (८६,००० विरुद्ध ८६,०००); अन्नाशी संबंधित / रेशनिंग वगैरे (२,९०,००० विरुद्ध २,१०,०००); खतांशी संबंधित (१,४०,०००

विरुद्ध १,१०,०००); पेट्रोलियमशी संबंधित (६,५०० विरुद्ध ५,८००)

प्रत्येक अर्थसंकल्प अर्थव्यवस्थेला दिशा देणारा असला पाहिजे असे सर्वसाधारणतः म्हटले जाते. पण कोणी अशी मांडणी केली की, अर्थव्यवस्थेला आधीच दिशा मिळाली आहे तर? तर अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट काय असले पाहिजे? ज्यावेळी एखादी गाडी कच्च्या रस्त्यावरून, उंच सखल भागातून, रस्ता शोधत फिरते त्यावेळी गाडीच्या चालकाला, मुक्कामापर्यंत घेऊन जाणारा पक्का रस्ता मिळेपर्यंत, सतत स्टिअरिंग व्हीलच्या सहाय्याने गाडीची दिशा बदलत राहावी लागते. पण एकदा गाडी हव्या त्या हायवेवर आली तर चालकाने स्टिअरिंग व्हील स्थिर ठेवले तरी पुरते. भारतीय अर्थव्यवस्थेने दिशा घेतली आहे आणि त्यात कोणतेही नाट्यपूर्ण बदल होणार हे सध्याचे राज्यकर्ते सांगू इच्छितात.

देशांतर्गत आणि जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये होणाऱ्या बदलांना प्रतिसाद देत केंद्र सरकार वर्षाचे ३६५ दिवस काहीबाही नवीन योजना, प्रकल्प, आधीच्या योजनात बदल जाहीर करतच असते. ज्याचे प्रमाण गेल्या काही वर्षात प्रचंड वाढले आहे. असे बदल करण्यासाठी दरवर्षी फेब्रुवारी उजाडण्यासाठी राज्यकर्ते वाट बघणार नाहीत. नजीकच्या भविष्यात वार्षिक अर्थसंकल्पाला नॉन इव्हेंट करणे हा राज्यकर्त्या वर्गाचा राजकीय अजेंडा आहे. त्यामुळे भविष्यात अर्थसंकल्प म्हणजे मागील वित्तवर्षाचा जमाखर्च सांगणारे आणि पुढील वर्षाच्या जमाखर्चाला संसदेची मंजुरी मिळवण्यासाठी बनवलेले फायनान्शियल स्टेटमेंट यापुरतेच उरले तर आश्चर्य वाटायला नको.

वरील सारे मेसेज परवाच्या अर्थसंकल्पातून भारतीय राज्यकर्ता वर्ग जागतिक राज्यकर्त्या वर्गाला देऊ पाहत आहे. यातून दिले जाणारे सिग्नल्स जागतिक भांडवलापर्यंत पोचतील आणि भारतात एफडीआय आणि एफआयआयमार्फत अजून भांडवलाचा ओघ वाढेल आणि

देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना दिली जाईल अशी ती मांडणी आहे.

यात अजून एक मुद्दा अधोरेखित होत आहे. देशातील गरीब आपल्या विरुद्ध कोणतीही राजकीय प्रतिक्रिया देणार नाहीत. आपण बिगर आर्थिक, भावनिक मुद्यांवर त्यांना संघटित करून आपली सत्ता अबाधित ठेवू शकतो याचा आत्मविश्वास राज्यकर्त्या पक्षाला आलेला आहे.

●

**संजीव चांदोरकर**

सहयोगी प्राध्यापक, टाटा समाजविज्ञान संस्था,
मुंबई

ईमेल– chandorkar.sanjeev@gmail.com

परिवर्तनाचा
वाटसरू

**वर्गणीचे दर**

वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १६०० रु.,
दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वा. व. २०० रु.,
सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर इ मनी ऑर्डर,
चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी.
‘परिवर्तनाचा वाटसरू’ या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

‘गुगल पे’साठी नंबर : 8888708963